**सं फौ.ख.क्र. १९६/२०१९**
**सरकार वि. मनोज**
नि. क्र. ०२ लगत

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ४ ची शपथेवर जबानी</u>**

माझे नांवः – विजय गजराजसिंग पायक

अंदाजे वयः – ५० वर्षे, व्यवसाय– खाजगी

राहणारः – गोंडखैरी, तह. कळमेश्वर, जि. नागपूर

**<u>सरतपासणीः सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती पल्लवी सोनवणे यांच्यातर्फे</u>**

१. मयत दिपक पायक हे माझे मोठे भाउ होते. ते बिसलेरी बॉटलच्या कंपनीत काम करीत होते. ते कामाला सायकलने जात होते. ते सकाळी ८.०० वाजता जायचे व रात्री ८.०० वाजता परत यायचे. घटना दिनांक १३.०७.२०१८ रोजी रात्री ८.०० ते ८.१५ वाजताच्या दरम्यान मधुबन बियरबार, गौंडखेरी समोर ते डयुटीवरुन परत येताना घडली. त्यावेळी त्यांचा मोटारसायकल क्रमांक एम.एच.३५/५८२६ प्लॅटिना ने अपघात झाला. त्या मोटारसायकल चालकाने समोरुन धडक दिली होती. अपघात झाला तेव्हा मी मार्केटमध्ये होतो. त्या दिवशी बाजार होता. मला गावातील लोकांकडून माहिती मिळाली. तेव्हा मी घटनास्थळी गेलो. तेव्हा माझा भाउ तेथे पडलेला होता व त्याच्या डोक्याच्या मागच्या बाजुला मार लागलेला होता. तेथे आरोपी मनोजपण हजर होता. त्यानंतर लोकांनी रुग्णवाहिका बोलाविली व माझ्या भावाला दवाखान्यात नेले. घटनास्थळावर मोटारसायकल पडून होती. आरोपी दारु पिवून होता. मी पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला होता. आता मला माझा तोंडी रिपोर्ट दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **<u>निशाणी क्र. ११</u>** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **<u>निशाणी क्र.१२</u>** देण्यात येते. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात गैरहजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री मोहिले यांच्या मार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझा भाउ वेगवेगळे राहत होतो. घटनेवेळी मी सकाळी ७.०० वाजता इस्त्रीचे दुकान उघडत होतो व सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत थांबत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या डयुटीची वेळ मला माहिती नाही. हे म्हणणे

खरे आहे की, माझा भाउ नेहमीप्रमाणे डयुटीवर जात होता. ती कंपनी आमच्या घरापासून एक किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, डयुटी संपल्यावर चेकिंग होते. हे म्हणणे खरे आहे की, डयुटीवरुन सुटल्यावर त्याला रोडवर येण्यासाठी दहा मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाला घरी पोहचण्यासाठी दहा ते पंधरा मिनिटे सायकलने लागत होते. घटना घडल्याचे मला सतीश पानठेला वाल्याने सांगितले होते. सतीश पानठेला वाल्याने मला फोन करुन सांगितले होते. मी सतीशचा फोन आला हे बयान देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ही गोष्ट मी पहिल्यांदा कोर्टात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणत्याही पानठेला वाल्याचा फोन आला नाही म्हणून मी पोलिसांना सांगितले नव्हते.

३. हे म्हणणे खरे आहे की, मला ज्या नंबरवरुन फोन आला हे सांगता येत नाही. माझ्याकडे मोबाईल असल्याचा पुरावा पोलिसांना दिला नव्हता. मी आज त्याचे कागदपत्र दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे मोबाईल नव्हता म्हणून मी कोणतेही कागदपत्र पोलिसांना दिले नाही व ते दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा मला फोन आला त्यावेळी घटना घडून गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळावर जाण्यासाठी वीस ते पंचवीस मिनिटे लागली. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात डोळयाने पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात डोळयाने पाहिलेला नाही त्यामुळे घटना कशी घडली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणते वाहन कोणत्या दिशेने येत होते हे मला सांगता येणार नाही. मी पोलिसांना बयान देतेवेळी आरोपी हा घटनास्थळी हजर होता हे सांगितले नव्हते.

४. आरोपी दारु पिवून होता, बडबड करीत होता हे मी रिपोर्ट व बयान देताना पोलिसांना सांगितले होते. परंतु ते माझ्या रिपोर्ट व बयानात नमूद नाही. ते का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी घटनास्थळी हजर होता हे मी आज कोर्टात पहिल्यांदा सांगत आहे. आरोपीच्या मोटारसायकलचा क्रमांक एम.एच.३५/५८२६ असा होता. ती गाडी कोणाच्या मालकीची होती याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, ती गाडी आरोपीची नव्हती व ती गाडी तो त्यावेळी चालवित नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्यानुसार कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

स्वा/-

ठिकाणः कळमेश्वर (आर. एल. राठोड)

**दि. ०९.०२.२०२६** न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, कळमेश्वर

**सं फौ.ख.क्र. १९६/२०१९**
**सरकार वि. मनोज**
नि. क्र. ०२ लगत

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ५ ची शपथेवर जबानी</u>**

माझे नांवः – शुभम दिपकसिंग पायक
अंदाजे वयः – २९ वर्षे, व्यवसाय– मजुरी
राहणारः – गोंडखैरी, तह. कळमेश्वर, जि. नागपूर

**<u>सरतपासणीः सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती पल्लवी सोनवणे यांच्यातर्फे</u>**

१. मयत दिपक पायक हे माझे वडील होते. ते बिसलेरी बॉटलच्या कंपनीत काम करीत होते. ते कामाला सायकलने जात होते. ते सकाळी ८.०० वाजता जायचे व रात्री ८.०० वाजता परत यायचे. घटना दिनांक १३.०७.२०१८ रोजी रात्री ८.०० ते ८.१५ वाजताच्या दरम्यान मधुबन बियरबार, गौंडखेरी समोर घडली. घटनेदिवशी मला माझा मित्र संदीप याचा फोन आला होता. तो म्हणाला की, माझ्या वडिलांचा अपघात झाला आहे व ते तेथे पडलेले आहेत. मी घटनास्थळी गेलो असता मला माझे वडील तेथे पडलेले दिसले, त्यांच्या डोक्याला मार लागलेला होता. ज्याने अपघात केला होता त्याची मोटारसायकल तेथेच होती. त्या गाडीचा क्रमांक एम.एच.३५/५८२६ असा होता. तेथे माझ्या वडिलांची सायकल पडलेली होती. त्यानंतर आम्ही माझ्या वडिलांना वेल ट्रीट हॉस्पिटल, वाडी येथे नेले. तेव्हा सोबत आई, मित्र व आत्याचा मुलगा होता. तेथे गेल्यानंतर डॉक्टरांनी तपासणी करुन ते मयत झाल्याचे सांगितले. तो अपघात मनोज दमाहे याने केला होता. तो पण घटनास्थळी उपस्थित होता व त्याची गाडीपण तेथे पडलेली होती. माझे वडील नागपूर रोड कडून घरी परत येत होते. आरोपी हा गोंडखैरीकडून नागपूरकडे जात होता. अपघात हा समोरासमोर झाला होता. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात गैरहजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री मोहिले यांच्या मार्फत**

२. मला साक्षी समन्स मिळाले नाही. माझ्या काकांना समन्स मिळाले होते. मी त्याच्यासोबत आलो. मधुबन बार हा आमच्या घराजवळ होते. हे म्हणणे खरे आहे की, मधुबन बार रस्त्यावर होते व आमचे घर आतमध्ये आहे. मी पोलिसांना बयान देताना घटना मधुबन बार जवळ घडली असे सांगितले होते. परंतु सदर बाब माझ्या बयानात नमूद नाही

याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना ते सांगितले नाही म्हणून त्यांनी लिहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बयान देताना मला मित्राचा फोन आला होता हे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ही बाब आज मी पहिल्यांदा कोर्टात सांगत आहे. सोबत आई, मित्र व आत्याचा मुलगा व आरोपी घटनास्थळावर हजर होता हे मी पोलिसांना बयान देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आज मी सदर बाब पहिल्यांदा कोर्टात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टात आल्यावर मला माहिती पडले की, आरोपी मनोज विरुध्द केस आहे म्हणून मी त्याच्या विरुध्द साक्ष देत आहे.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात आल्यावर माझे बयान वाचले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या अनुषंगाने मी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोटारसायकल क्रमांक एम.एच.३५/५८२६ आरोपीची आहे याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मोटारसायकल कोणाच्या मालकीची आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळी मी माझ्या घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा फोन आला तेव्हा घटना घडून गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष डोळ्याने पाहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना कशा पध्दतीने झाली ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत माझे वडील असल्यामुळे मी काल्पनिक मोटारसायकल नंबर दिला.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मनोज दमाहे कुठे राहतो हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेपूर्वी मी आरोपीला पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा या घटनेशी प्रत्यक्ष संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझे बयान पोलीस स्टेशनला घेतले होते. ज्या दिवशी फिर्याद दिली त्या दिवशी बयान घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही, आरोपीचा व त्याच्या मोटारसायकलचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण</u>**

**<u>फेरतपासणीः सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती पल्लवी सोनवणे यांच्यातर्फे</u>**

५. आमच्यासोबत घटना घडली होती म्हणून मी सदर साक्ष देत आहे. बयान वाचल्यामुळे नाही.

**<u>फेरतपास संपला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

स्वा/-

ठिकाणः कळमेश्वर

(आर. एल. राठोड)

**दि. ०९.०२.२०२६**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, कळमेश्वर

## <u>प्रमाणपत्र</u>

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम.परमाल (नि.श्रे.)